दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Legrand HAVELLS Finolex KOLORS USHA PHILIPS SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक १२३ वा मंगळवार दि.०३ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# राहूल गांधींनी अदानीसंदर्भात शरद पवारांच्या भूमिकेवर सवाल करुन आपली निर्णय क्षमता सिध्द करावी:ॲड.प्रकाश आंबेडकर

लातूर,दि.२: देशाला लुटणार्या अदानीसंदर्भात काँग्रेसची भूमिका विरोधातली आहे,काँग्रेसने अदानीला टार्गेट करावे,पण राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे अदानीबाबत भूमिका स्पष्ट करायला तयार नाही,त्यामुळे राहूल गांधींनी याबाबत पवारांना सवाल करुन आपली निर्णय क्षमता सिध्द करावी,असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी येथे पत्रकार परिषदेत बोलताना दिले.

वंचित बहुजन आघाडीच्या लातूर येथील जाहीर सभेच्या निमित्ताने आलेल्या ॲड.आंबेडकर यांनी शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी वार्तालाप केला.त्यावेळी त्यांनी हे आव्हान दिले. गायी,म्हशी,मुस्लिम,लव्हजिहाद च्या नावाने बोंब मारणार्या बजरंग दल आणि मोदींनी,या देशातील १ लाख १३ हजार हिंदूंनी केवळ सव्वा महिन्यात देशात सुरक्षितता,भवितव्य दिसत नाही म्हणून देशाचे नागरिकत्व सोडले आहे,याचे उत्तर द्यावे,आरएसएस,सनातनवाल्यांची या देशातल्या दलित,आदिवासी,शुद्र,अतिशुद्रांविषयी आपली भूमिका स्पष्ट करावी,या घटकांना तुम्ही माणूस म्हणून वागवतच नसाल तर तुम्हाला आमचा विरोधच राहील असे सांगून ॲड.आंबेडकर म्हणाले की, केंद्रातील मोदी सरकारला येणार्या निवडणूकीसाठी मुद्देच नसल्याने व सर्वच आघाड्यांवर ते अपयशी ठरल्याने गोधरा,मणिपूर प्रमाणे अनेक भागात दिवाळी नंतर आर्थिक आणि धार्मिक दृष्टिने बेकाबू परिस्थिती निर्माण होईल,तसे त्यांचे नियोजन झालेले दिसतेय.बाबासाहेबांना देशाचे जनक मानणारे आणि देशाची वाट लागू नये,या विचारांचे काही अधिकारी आहेत,त्यांच्याकडून मला माहिती मिळते. राणे सारख्या चिंधी चोरांनी माझ्या वाटेला येवू नये,मी बाबासाहेबांचा नातू आहे,असा सल्ला देवून लोकसभेच्या निवडणुका होईपर्यंत देशातील महत्वाची पाच हिंदू मंदिरे मिलीटरीच्या ताब्यात द्यावीत अशी मागणी केली.गणेश विसर्जनाच्या दिवशी ईद आली पण ती दुसर्या दिवशी साजरी करण्याचे मुस्लीमांनी दाखविलेले सामंजस्य कौतुकास्पद आहे.आदिवासींना घटनेच्या शेड्युल ५ व ६ प्रमाणे आपले क्षेत्र सांभाळता येते,घाबरण्याचे कारण नाही,मागासांचे आरक्षण संपवले जातेय,सर्वोच्च न्यायालयाने मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण देण्यासंदर्भात सहमतीच दिलेली असता मुस्लीम त्यासाठी सवाल करत नाहीत ते मुर्ख आहेत.तर मराठा आरक्षणासंदर्भात आम्ही गरीब मराठे,जरांगे पाटलांसोबत आहोत,पण समाजाने मराठा आरक्षणासंदर्भात अशोक चव्हाण व इतर मोठ्या नेत्यांना विचारावे असा सल्ला त्यांनी दिला. युपीएसी,एमपीसएसीकडून झालेल्या नोकरभरतीला अर्थ आहे.चार बेकायदेशीर कंपन्याकडून होणारी कंत्राटी नोकर भरती चुकीची आहे.शासकीय सेवेतील जबाबदार अधिकार्यांनी या भरतीसंदर्भात मंत्र्यांना यासाठी लेखी आदेश मागावा,तुम्ही अगोदर देशाचे नागरिक आणि कर्मचारीही आहात, हा देश सार्वभौम आहे, आम्हाला सत्तेत बसवा,कंत्राटी केलेल्यांना कायम शासकीय करु,चुकीचा निर्णयाचा फेरविचार करु,असे अश्वस्त करतानाच मग मुख्यमंत्री पदही कॉंट्रक्टरवर भरा,असा समाचार घेवून कुठल्याही परिस्थितीत आम्ही निवडणुकीसाठी भाजपासोबत युती करणार नाही, उध्दव ठाकरेसोबत आहेत,राष्ट्रवादी, काँग्रेसवाले जागा वाटपाचे घोंगडे भीजत का ठेवत आहेत,अशी शंका येते पण ती आताच घेणार नाही,पण तो आरोप नव्हे माझी धमकी समजावी,असे त्यांनी आव्हान देवून राज्यात इंडिया आघाडीत लोकसभेला भागीदारी नाही मिळाल्यास ४८ जागा आम्ही स्वबळावर लढणार निर्धार ॲड.आंबेडकर यांनी जाहीर केला. या पत्रकार परिषदेला वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर,मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील,मराठवाडा महासचिव सतोष सूर्यवंशी,जिल्हा महासचिव सलीम सय्यद,लातूर महिला आघाडी अध्यक्षा मंजूषा निंबाळकर, शहराध्यक्षा सुजाता अजनीकर,ॲड.रमेश गायकवाड,डॉ.अजनीकर, ॲड.धम्मदिप बलांडे,सचिन लामतूरे,ॲड.रोहित सोमवंशी, राजेंद्र सावरगावकर,राजाभाऊ सरवदे, महेंद्र बनसोडे,यशंवत बोरीकर, बालाजी कांबळे,प्रा. वाघमारे,कालिदास माने आदी उपस्थित होते.



## गल्लीतील दादा, भाईंना राजकरणात नो एन्ट्री

नवी दिल्ली : राजस्थानमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी जोरात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगही सज्ज झाले आहे. गुन्हेगारांचा राजकारणातील प्रवेश रोखण्यासाठी निवडणूकआयोगाने पाऊल उचलले आहे. नव्या नियमानुसार गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला तिकीट का दिले, याचे स्पष्टीकरण राजकीय पक्षांना वृत्तपत्रातून द्यावे लागणार आहे. त्याचबरोबर उमेदरवांनाही वर्तमानपत्रात जाहिराती देऊन गुन्हेगारी रेकॉर्डची माहिती द्यावी लागणार आहे.

जयपूरमध्ये माध्यमांशी संवाद साधतना मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, निवडणूक आयोग मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांसाठी कटिबद्ध आहे. यासाठी गुन्हेगारांचा राजकारणातील प्रवेश रोखण्यासाठी निवडणूक आयोगान पाऊल उचलले आहे. गुन्हेगारांना पक्षाने उमेदवारी का दिली? याचे उत्तर राजकीय पक्षांना सांगावे लागणार आहे.

राजस्थानमध्ये पहिल्यांदाच घरबसल्या मतदान करण्याची सुविधा वृद्ध मतदारांना तसेच ४० टक्के अपंग असलेल्या लोकांना उपलब्ध होणार आहे. सक्तीच्या मतदानाचा कोणताही प्रस्ताव निवडणूक आयोगापुढे नाही.

### राजस्थानमध्ये एकूण ५.२५ कोटी मतदार

राजीव कुमार पुढे म्हणाले की, मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी आणि मतदान सुलभ करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. यासोबत राज्यात निवडणूक काळात सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी सीमावर्ती भागात विशेषत: हरियाणा आणि पंजाब सीमेवर दारू आणि वाहतूक रोखण्यासाठी कडक सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात एकूण ५.२५ कोटी मतदार असून त्यात २.७३ कोटी पुरुष, २.५१ कोटी महिला आणि ६०४ तृतीयपंथी मतदार आहेत. १८,४६२ मतदार १०० वर्षांवरील, ११.८ लाख ८० वर्षांवरील आणि २१.९ लाख प्रथम मतदार आहेत.

### अधिका-यांच्या बैठका

आयोगाच्या सदस्यांसह राज्याच्या दौ-यावर असताना शुक्रवारपासून राज्य सरकारच्या अधिका-यांच्या निवडणुकीच्या तयारीसंदर्भात अनेक बैठका घेतल्या. तीन दिवसांच्या दौ-यात आयोगाने राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, मुख्य सचिव, पोलिस महासंचालक, जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधीक्षक आणि इतर अधिका-यांच्या बैठका घेतल्या. निवडणुकीत १६०० मतदान केंद्रे महिला, २०० केंद्रे दिव्यांग आणि १६०० केंद्रांचे व्यवस्थापन नवनियुक्त तरुण करणार आहेत. एकूण ५१७५६ मतदान केंद्रांपैकी ५० टक्के मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगही करण्यात येणार आहे.

## भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते रेणापूर येथील माती दिल्लीच्या अमृतवाटिकेसाठी रवाना

लातूर दि.०२- देशाच्या अमृत महोत्सव निमित्ताने पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या सूचनेनुसार 'मेरी माटी मेरा देश' अभियानांतर्गत रेणापुर शहरातील सर्वच प्रभागातून गोळा करण्यात आलेली माती एका कलशातून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभ हस्ते दिल्ली येथे होणाऱ्या अमृतवाटिकेसाठी रविवारी पाठविण्यात आली.

देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शूरवीर आणि स्वातंत्र्य सैनिकाच्या स्मरणार्थ देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या संकल्पनेतून मेरी माटी मेरा देश अभियानांतर्गत दिल्ली येथे राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या जवळ निर्मित होणाऱ्या अमृतवाटिकेसाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून ७ हजार ५०० मातीचे कलश आणले जाणार आहेत. त्यातून एक भारत श्रेष्ठ भारत या वचन पद्धतीचे प्रतीक असलेल्या अमृतवाटिकेची निर्मिती केली जाणार आहे.

माझी माती माझा देश या अभियानांतर्गत रेणापूर शहरातील सर्वच प्रभागातून गोळा करण्यात आलेल्या मातीचा कलश भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते दिल्लीसाठी विधिवत पूजा करून रवाना करण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड, गटविकास अधिकारी सुमित जाधव, भाजपाचे विक्रमकाका शिंदे, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, वसंत करमुडे, सतीश आंबेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संपूर्ण अभियानाची माहिती रेणापूर नगरपंचायतीचे मुख्य अधिकारी मंगेश शिंदे यांनी उपस्थितांना दिली. प्रारंभी प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे,



भाजपाचे तालुकाध्यक्ष अॅड दशरथ सरवदे यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

रेणुका देवी मंदिर परिसरात रविवारी झालेल्या या कार्यक्रमास भाजपाचे दत्ता सरवदे, श्रीकृष्ण जाधव, विजय गंभीरे, सचिन चेवले, चंद्रकांत कातळे, श्रीकृष्ण पवार, भागवत गीते, गोपाळ शेंडगे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, अमर चव्हाण, शिवमुर्ती उरगुंडे, शिला आचार्य, माधव गुडे, उत्तम चव्हाण, गणेश तूरूप, रमाकांत संपत्ते, संतोष चव्हाण, उज्वल कांबळे, अच्युत कातळे, राजू आलापुरे, अंतराम चव्हाण, शेख अजीम सुरेश बुड्डे, रमा चव्हाण, लखन आवळे, हनुमंत भालेराव, दिलीप चव्हाण, संतोष राठोड, गणेश माळेगावकर, नगर पंचायतीचे मंगेश देशमुख, विशाल विभुते, अभिजीत धायगुडे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयाने ' स्वच्छता ही सेवा ' उपक्रमांतर्गत दिला श्रमदानातून स्वच्छतेचा संदेश

लातूर : ' स्वच्छता पंधरवडा- स्वच्छता ही सेवा ' अंतर्गत दि.०१ ऑक्टोंबर २०२३ रोजी जिल्ह्यात ' स्वच्छतेसाठी एक तारीख,एक तास ' ही मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेतंर्गत दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून ०१ ऑक्टोंबर २०२३ रोजी ' स्वच्छता ही सेवा ' अभियान राबविण्यात आले.यावेळी महाविद्यालयाचा परिसर,बगीचे व मैदान इत्यादी ठिकाणी सकाळी दहा ते अकरा या वेळेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड व उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आणि विद्यार्थ्यांनी श्रमदानातून स्वच्छतेचाही संदेश दिला.




रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.राहुल जाधव व डॉ.सुरज कोल्हे आणि राष्ट्रीय छात्र सेना कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी यांनी विद्यार्थ्यांना ' एक कदम स्वच्छता की और ' असे आवाहन केले,या आवाहनानुसार श्रमदानातून स्वच्छता करण्यात आली.याप्रसंगी रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी अनंत शिरोळे,विदूला राजमाने यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो व राष्ट्रीय छात्र सेना स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# शासनाच्या दुर्लक्षामुळेच नांदेडात मृत्यूचे तांडव

नांदेड : येथील डॉ.शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाची भव्य वास्तू केवळ आता शोभेचे बाहुली बनली आहे. या वास्तूमध्ये घाणीचे साम्राज्य असून औषध पुरवठा, नर्सेस व डॉक्टरांचा स्टॉफ अत्यंत कमी आहे. त्यामुळे रुग्णांची सुश्रुषा नीटनेटकी होत नाही. दुर्दैवाने या समस्यांची परिणिती म्हणून २४ तासात २४ रुग्णांना जीव गमवावा लागला. त्यामध्ये दोन दिवसांच्या आतील १२ बालकांचा समावेश आहे.



नांदेडमध्ये झालेल्या मृत्यूचे हे तांडव शासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे झाल्याचा गंभीर आरोप या भागातील स्थानिक आमदार व अभ्यागत मंडळाचे माजी अध्यक्ष आ.मोहनअण्णा हंबर्डे यांच्यासह माजी सदस्य संतोष पांडागळे,डॉ.करुणा जमदाडे, शेख लतिफ यांनी केला आहे.

२४ तासांत २४ रुग्ण मृत्यू झाल्याची घटना समजताच माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी रुग्णालयास भेट दिली. महाविद्यालयातील भयाण वास्तवाची यानिमित्ताने माहिती उजेडात आली. वारंवार सांगूनसुध्दा शासनाकडून या वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयास आर्थिक मदत केल्या जात नाही. सिटीस्कॅन यासारख्या करोडो रुपये खर्च करुन खरेदी करण्यात आलेल्या अनेक मशिन केवळ शासनाने एएमसी अर्थात वार्षिक देखभाल निधी न दिल्यामुळे धूळ खात पडून आहेत.

या विषयी शासनास काही गांभीर्य नाही. मागील दीड वर्षांपासून या महाविद्यालयास पूर्ण वेळ अधिष्ठाता दिला नाही. प्रभारी राज सुरु आहे. प्राध्यापकांच्या प्रतिनियुक्त्या केल्या आहेत. मोठ्या प्रमाणात नर्सेसचा तुटवडा आहे. यामुळेच या रुग्णालयातील रुग्णसेवा कमालीची ढासळल्याचा आरोप आ.मोहनअण्णा हंबर्डे, संतोष पांडागळे, डॉ.करुणा जमदाडे ,शेख लतिफ यांनी केला आहे. अभ्यागत मंडळ निर्मितीनंतर कोविडच्या काळात केवळ दोन बैठका घेण्यात आल्या. या बैठकांमध्ये एकाही बाबींची परिपूर्तता झाली नाही. त्यानंतर सत्तांतर झाले. परंतु नवीन अभ्यागत मंडळ दिले नाही. किंवा जुन्या अभ्यागत मंडळ सदस्यांना हे मंडळ अस्तित्वात आहे किंवा नाही याची माहिती देखील दिली नसल्याचा खेद व्यक्त केला.

आ. मोहनअण्णा हंबर्डे यांनी रुग्णालयातील स्टॉफ, औषध पुरवठा, स्वच्छता या संदर्भात पालकमंत्र्यांसह मुख्यमंत्र्यांना कमीत कमी २५ पत्र दिली. पालकमंत्र्यासमोर सार्वजनिक भाषणामध्ये महाविद्यालयाच्या सुविधांकडे लक्ष पुरविण्याची मागणी केली. परंतु असे काहीच घडत नसल्याचा आरोप आ.मोहनअण्णा हंबर्डे यांनी केला.देशाचे माजी गृहमंत्री डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या सारख्या निष्कलंक चारित्र्याचा धनी असलेल्या नेत्याच्या नावाने असलेल्या महाविद्यालयाचा दर्जा सुधारण्यासाठी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी पुढाकार घेवून शासनास भाग पाडावे असेही माजी अभ्यागत मंडळाने म्हटले आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# अश्विन दाणी

या कंपनीत तब्बल साडेपाच दशके कारकीर्द राहिलेले तिचे माजी अध्यक्ष दाणी यांनी वयाच्या ८१ व्या वर्षी या जगाचा गुरुवारी निरोप घेतला. भारतीय परंपरेतील कला-वैविध्य, उत्सवप्रियता, सामाजिक- सांस्कृतिक जिवंतपणा बव्हंशी रंगातूनच अभिव्यक्त होत असतो. रंगांचा देश म्हणूनच जगात भारताची ओळख आहे. भारतीय संस्कृतीतील रंगांचा वापर हा केवळ सजावटीसाठी नव्हे, तर धार्मिक, राजकीय प्रतीक म्हणून आजही होताना दिसतो. या रंगनिर्मिती उद्योगात पहिली भारतीय कंपनी एशियन पेंट्सला मात्र त्या काळी सात ब्रिटिश कंपन्यांशी स्पर्धा करूनच स्थान निर्माण करता आले. १९४२ साली स्थापित एशियन पेंट्सने काही दशकांपूर्वी केवळ आत्मनिर्भर वाटचाल सुरू केली इतकेच नाही तर ती जगातील १८ देशांच्या बाजारपेठांत दमदार स्थान कमावणारी सर्वात मोठी भारतीय बहुराष्ट्रीय रंग निर्माता कंपनीही बनली. हे शक्य झाले रंग उद्योगाचे अग्रदूत म्हणून लौकिक कमावणाऱ्या अश्विन सूर्यकांत दाणी यांच्या कामगिरी आणि कर्तबगारीने. या कंपनीत तब्बल साडेपाच दशके कारकीर्द राहिलेले तिचे माजी अध्यक्ष दाणी यांनी वयाच्या ८१ व्या वर्षी या जगाचा गुरुवारी निरोप घेतला. उद्योजकीय यश हा कुणा खास नशीबवानांचा विशेषाधिकार नसतो, तर उपलब्ध संधींचा लाभ आणि अंगी असलेल्या गुण, संसाधनांचा कसबी वापर करून ते साधता येते. अश्विन दाणी यांनी हे पुरेपूर सिद्ध करून दाखविले. वडिलांनी अन्य तीन भागीदारांसह स्थापित केलेल्या उद्योगात दाणी यांनी पाऊल टाकले तरी, कंपनीत नेतृत्वस्थान मिळविण्याआधी त्यांनी विविध जबाबदाऱ्यांसह एक एक शिडी चढत जाणारा प्रवास केला. शिवाय या व्यवसायात प्रवेशापूर्वी आवश्यक ते प्रगत शिक्षण, प्रशिक्षण त्यांनी पूर्ण केले आणि अमेरिकेतील शिक्षणानंतर काही काळ तेथील कंपनीत उमेदवारीही त्यांनी केली. या पूर्वपीठिकेमुळेच पुढे नेतृत्वपदी येताच कंपनीच्या वाढीच्या उन्नत कक्षा त्यांना खुल्या करता आल्या. उद्योगातील तीव्र स्पर्धेला टक्कर देत, एशियन पेंट्सचा कायापालट त्यांनी घडवला. ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन अंगीकारून निरंतर नावीन्यतेची कास धरल्यामुळेच हे शक्य झाले. खुद्द दाणी म्हणत असत की, रंगांच्या व्यवसायात असणाऱ्यांना एकसुरी, एकमार्गी वाट धरता येत नाही, त्यांनी स्वाभाविकच नावीन्य अंगीकारणे, बदलत्या आवडनिवडींबाबत संवेदनशील असण्याशिवाय गत्यंतरच नाही. यातूनच त्यांनी एशियन पेंट्समध्ये संशोधन व विकास विभाग कार्यान्वित केला आणि नफ्यातील लक्षणीय हिस्सा त्यावर खर्ची पडेल हेही पाहिले. त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे, अनेक अनोखी उत्पादने बाजारात आली. भारतात पहिल्यांदाच संगणकीकृत रंग जुळणीचा अवलंब केला गेला. मध्यमवर्गीय कुटुंबातच नव्हे तर रंग उद्योगाला ग्रामीण बाजारपेठेत ग्राहक पाया यातून निर्माण करता आला. नियमित योगाभ्यासावर भर असलेले, चित्रकलेत विशेष रुची असणारे दाणी यांनी जबाबदार उद्योजकतेला अधोरेखित करणाऱ्या सामाजिक आणि पर्यावरणीय कल्याणासाठी पुढाकार घेणाऱ्या उपक्रमांचीही रुजुवात केली. एशियन पेंट्सवर बिगर-कार्यकारी संचालक म्हणून सध्या काम करत असलेला तीन मुलांमधील धाकटय़ा मलव याच्या माध्यमातून त्यांनी उद्योजकीय वारशाचा प्रश्न सोडवला आहे. चिरस्थायी मूल्य निर्माण करणाऱ्या उद्योजकीय क्षमतांचा त्यांनी निर्माण केलेला वारसा खूप मोठा असून, तो भारताच्या उद्योग क्षेत्राची कायम साथ निभावेल.

# रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट कोणते ?.

३ ऑक्टोबर,१९५७ रिपाईच्या वर्धापन दिना निमित्य विशेष लेख.

आजच्या तरुणांना रिपब्लिकन पक्ष कोणाचा आहे असे विचारले तर काय उत्तर मिळेल?.ते ऐकण्याची तयारी कोणाचीच नसणार, कारण त्यांच्या आजू बाजूच्या नगरातील विभागातील कार्यकर्ते नेते दररोज सकाळी कुठे भेटतात आणि संध्याकाळी काय करतात. त्यांचे उधोगधंदे व उत्पन्नाची साधन व मार्ग कोणते यांची पूर्ण कल्पना विभागातील समाजाच्या लोकांना असते. त्यांनी जर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे क्रांतिकारी तत्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला तर लोक त्यांच्या कडे तिरक्या नजरेने पाहतात. कारण क्रांतिकारी विचाराचे आचार कुठेच दिसत नाही.दलाली,गुलामगिरी आणि लाचारी नसानसात भरलेली माणस जेव्हा स्वाभिमानाची गोष्ट करतात तेव्हा जवळची लोकच त्यांच्या कडे संशयाने पाहतात.ते तसे जगण्यासाठीच एकाच नगरात एकाच गटाशी प्रामाणिक राहत नाही, तथागत बुद्ध वाचनालय काढतील पण त्यावर बुद्ध आंबेडकर यांच्या फोटो पेक्षा राष्ट्रवादी नेत्याच्या भाऊ,वहिनी,आईचा फोटो किती महत्त्वाचा आहे हे नगरातील विभागातील लोकांना दाखवुन देतील त्याला स्वाभिमानी,आंबेडकरी विचारांची माणस विरोध करण्याचे धाडस कधीच करणार नाहीत. मागे जरूर बोलतील पण समोर नाही.मूर्ख आहे तो त्यांच्या कशाला नादी लागावे असे म्हणूनच त्याला सोडून देतील.पुढे जयंतीला,वर्षावास समारोप, महापरिनिर्वाण दिनाला भोजन दान व बॅनर त्यांच्या कडुन मात्र न चुकता घेतील.त्यामुळे नगरात विभागात रिपब्लिकन कार्यकर्ता नेता जातीने व कार्याने ओळखला जातो.आज माझी मुले विचारतात रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट काय होते ?.ते कुठे दिसते काय ? प्रत्येक नेत्याचे समाजा बाबत काय मत आहे हे जर ऐकले तर लढावे की रडावे हाच प्रश्न पडतो.क्रांतिकारी विचाराचा शब्द रिपब्लिकन आणि बहुसंख्येने असलेला समाज म्हणजे हत्ती सारखी शक्ती तीच आपली निशाणी.कुठे आहे?.

भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अधिकृत नाव रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया असे आहे. भारतीय रिपब्लिकन पक्ष हा भारतातील शोषित पिडीत आदिवाशी मागासवर्गीय समाजाचा म्हणजे बहुजन समाजाचा रिपाई म्हणूनच ओळखला जातो.तसा भारतातील सर्वात मोठी संख्या असणारया समाजाचा हा राजकीय पक्ष आहे. शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन (एससीएफ / शेकाफे) ही १९४२ मध्ये दलित समाजाच्या हक्कांसाठी व त्याच्या प्रचाराठी डॉ.भिमराव आंबेडकरांनी यांनी भारतात स्थापन केलेली संस्था होती. त्यांनी इ.स. १९३० मध्ये डीप्रेस्ड क्लासेस फेडरेशन आणि १९३५ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनने यापैकी कोणत्या दोन संस्था यशस्वी केल्या आहेत याबद्दल भिन्न मते आहेत. शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनचेच रूपांतर पुढे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मध्ये झाले.डॉ.भिमराव आंबेडकरांनी सुरू केलेल्या शेडूयूल्ड कास्टस फेडरेशन या सामाजिक संघटनेतून हा पक्ष उदयास आला.या पक्षाचे मुख्य बलस्थान महाराष्ट्र होते.शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशन या सामाजिक संघटनेने राजकारणात उतरून निवडणुकीत भाग घेतल्यामुळे अनेक समाजाचे समीकरण बदललेले होते.त्याचमुळे त्याची राजकीय पक्षात गणती होत होती.आज तो सत्ता मिळवुन देणारा समाज म्हणूनच ओळखला जातो. शेडूयूल्ड कास्टस फेडरेशन या सामाजिक संघटनेतून राजकीय पक्ष.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ही संकल्पना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची होती.त्याच्या महापरीनिर्वाणा नंतर ३ ऑक्टोबर १९५७ रोजी त्यांच्या निष्टावंत अनुयायांनी रिपाईची स्थापन केली.पण सुरवात पासूनच या पक्षाचा संपूर्ण इतिहासच अहंकाराचा आणि फाटाफुटींनी भरलेला आहे. तेव्हा पासून आज पर्यंत दररोज 'रिपब्लिकन' हा शब्द असलेला एक राजकीय पक्ष (गट) स्थापन होतो आणि पुढे तो फुटतो, असे या ऐतिहासिक रिपाई प्रक्रियेचे एकूणच वर्णन करता येईल.त्यामुळेच रिपब्लिकन पक्ष त्यांच्या अंतिम उद्धिष्ठा पर्यंत पोचला नाही. भारताला आणि भारतीयांना कठीनातील कठीण प्रश्न,समस्या सोडविण्यासाठी त्यांनी लोकशाही दिली.संविधानाची योग्य अमंलबजावणी केली तर कोणत्याही समस्या सुटू शकते.पण रिपाई ने त्याला महत्व न देता स्वार्थ व अहंकार या शब्दाला यांनी खूप महत्व दिले आहे.म्हणून आज ही यांची संपूर्ण इमारत त्यावरच उभी आहे.बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ बौद्ध धम्माची दिक्षा देताना त्यात त्यांनी त्रिसरण,पंचशील,आणि बावीस प्रतिज्ञा दिल्या होत्या हे सर्वच कार्यकर्ते नेते विसरले आहेत म्हणून रिपाई किंवा इतर समाजिक,धार्मिक संघटना नेहमी अहंकारा पायी फुटतात असे म्हटले तर चूक ठरणार नाही.त्यांनी संविधान मान्य केले असते तर आज रिपब्लिकन समाज रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ठ गाठण्याच्या स्पर्धेत असता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पक्ष म्हणून ओळखणारा रिपाई पहिल्यांदा फुटला तो १९५८ साली. म्हणजे पक्ष स्थापने नंतर एक वर्षांच्या आतच. तेव्हा ही नेतृत्व कुणी करायचे, यावरूनच पक्ष फुटला होता. त्यातून खोब्रागडे -गायकवाड आणि कांबळे-रूपवते असे दोन गट निर्माण झाले. १९६४ मध्ये गायकवाड गटातून आर. डी. भंडारे बाहेर पडले तर १९६५ मध्ये कांबळे गटात फूट पडून रूपवते बाहेर पडले आणि गायकवाड गटाशी त्यांचे ऐक्य झाले.म्हणजे ज्यांना विरोध केला त्यांच्या कडेच गेले.पुढे आर डी भंडारे आणि रुपवते कॉंग्रेसवासी झाले. त्यानंतर आजपर्यंतचा या पक्षाचा संपूर्ण प्रवास फाटाफूट आणि ऐक्य यांनी रंगलेला आहे. वारंवार झालेल्या या फाटाफुटी व ऐक्यामुळे 'फूट' आणि 'ऐक्य' या दोन्ही शब्दांचे रिपब्लिकन चळवळीच्या संदर्भातले गांभीर्यच नष्ट झाले आहे.आता पर्यंत या पक्षाची ५० हून अधिक छकले झाली आहेत, आणि अशा प्रत्येक छकलाचा एक स्वतंत्र राजकीय पक्ष झाला.रिपाई नांवा शिवाय हे स्वताचे अस्तित्व दाखऊ शकत नाही.आंबेडकर अनुयायाची आत्मपरीक्षण करण्याची तयारी नसल्यामुळे मी बरोबर बाकी सर्व चूक हे सिद्ध करण्यात या नेत्यांनी आपली व्यापक रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात येऊच शकत नाही ? एड बाळासाहेब आंबेडकर यांच्या आंबेडकरी चळवळ संपली आहे पुस्तकरुपी निष्कर्षा नंतर त्यांनी आंबेडकरी चळवळीचे काम सोडून दिले आणि डाव्या विचाराच्या विविध गटांना जवळ करून नक्षलवादी विचाराच्या तरुणाना जाहीर पाठिंबा दिला त्यातूनच महाराष्ट्र लोकशाही आघाडी निर्माण झाली होती.

प्रा.जोगेंद्र कवाडें सारखा प्रामाणिक नेता खासदाराचे मागच्या दराने आमदार झाले.आणि रिपाई मधील उरला सुरला प्रामाणिकपणा संपवला.रिपब्लिकन चळवळ नावापुरती शिल्लक राहली असा धोक्याचा गंभीर इशारा देणाऱ्या बाळासाहेबांनी आंबेडकरी चळवळीच्या वाताहताची शोधून काढलेली कारणे आणि मांडलेले निष्कर्ष पाहता त्यावर सविस्तर चर्चा खूप झाली.पण ते केवळ कार्यकर्त्याच्या लेवलवर ती बुद्धीजीवी वर्गाच्या पातळीवर झाली असती तर समाजाला नेमखी दिशा देता आली असती.परंतु बहुसंख्य बुद्धीजीवी भिती पोटी सत्य मांडण्याचे धाडस करीत नाही. अनेकांनी आंबेडकरी चळवळ संपली नसल्याचे दावे केले, पण तिच्या जीवंतपणाची लक्षणे कोणती ह्याबाबत ठामपणे स्पष्टीकरण दिले नाही.आज आंबेडकरी चळवळीचे बालेकिल्ले संपूर्णपणे उध्स्त झालेले (वैचरिक पातळीवर) स्पष्ट दिसतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहलेल एक पत्र १ ऑक्टोबर १९५७ रोजी 'प्रबुध्द भारत' मध्ये भारतीय जनतेला उद्देशून प्रसिद्ध झाले होते. हे पत्रच रिपब्लिकन पक्षाची घटना मानली जावी असा सर्व नेत्याचा आग्रह होता.त्यात न्याय,समता,स्वातंत्र्य आणि बंधुता ही पक्षाची ध्येय असतील,पक्षाच स्वरुप प्रादेशिक न राहता ते देशव्यापी असेल असे स्पष्ट करुन,आपल्या अनुयायांना बाबासाहेब सांगतात, 'हा पक्ष देशातील सर्व कष्टकरी मागासवर्गीय समाजातील शोषित,वंचित,पिडीत जनतेच्या हिताचा रक्षणकर्ता असेल. अनुसूचित जाती-जमाती, बौद्ध आणि मागासवर्गीय लोकांच्या हितासाठी प्रयत्न करण्याची बांधिलकी स्विकारलेला असेल.शासनकर्ती जमात बनतांना जो पक्ष आपल कल्याण करील, त्यांच्याशी हातमिळवणी करावी. दुस-या पक्षाशी सहकार्य करतांना आपला पक्षाच्या तत्वज्ञान,ध्येय आणि उदिष्ट यांना धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी. नेता एकच असावा आणि पक्षही एकच असावा. पक्षाच चिन्ह हत्ती हे बुद्ध संस्कृती मधिल प्रतिक तर, अशोक चक्रांकित निळा झेंडा हे निशाण असे बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या पक्षाबद्दलचे मत स्पष्टपणे मांडलेले होते.हा इतिहास आजचा तरुण वाचायला तयार नाही. म्हणून तो इतिहास वाचून इतिहास घडविण्यास तयार नाही.तो दिशाहीन झाला आहे.




डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर ३ ऑक्टोबर १९५७ साली बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाची नागपूर दिक्षा भूमीवर स्थापना झाली होती. त्यानंतरच्या सार्वत्रिक निवडणूकात पक्षाने दैदिप्यमान, नेत्रदिपक यश संपादन केले होते. त्यावेळी त्याची राजकीय शक्ती प्रभावशाली आणि सर्व समाजाचे लक्षवेधनारी होती, त्यात सतर टक्के असंघटीत कष्टकरी मजूर,शेतमजूर, कामगार होता.त्यांचा नेत्यावर विश्वास होता.पण त्यानंतरच्या काळात बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचाराचा नेत्यांना विसर पडला आणि युती आघाडी वर भर देण्यात आला.त्या काळी एका मान्यताप्राप्त नेत्याचा एक मंत्र होता गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाही तर मोडून खाल्ली. बाबासाहेब आंबेडकरांनी उभी केलेली पोलादी,प्रभावशाली,बलाढ्य एकसंघ असलेली संघटना,रिपब्लिकन पक्षाची चळवळ सामाजिक,राजकीयदृष्ट्या सक्षम नेतृत्वा अभावी,मतभेद,अहंकार,स्वार्थी राजकीय महत्त्वकांक्षापोटी फुटत गेली. इतर राजकीय पक्षांशी तडजोड करीत.प्रत्येक गटाचे नेतृत्व बेफिकीर,दिशाहीन बनत गेले. गटा तटाच्या निच राजकारणामुळे आपल्या समाजातील अनेक लोक इतर राजकीय पक्षात कार्यरत होत गेले.या सर्व घडामोडींवर बारीक लक्ष ठेवणारा फार मोठा बुद्धिजीवी वर्ग अलिप्त राहिला.आज आमचे काही दैनिक आहेत पण त्या दैनिकाच्या संपादकाचे आंबेडकरी चळवळी बाबत कोणत्याही विषयावर एक मत होत नाही.राजकीय नेत्या सारखे ते एकमेकाच्या जवळ बसून किमान एक कार्यक्रम बनवून समाजा समोर भूमिका मांडण्याची हिंमत दाखवत नाही.त्याच बरोबर आंबेडकरी विचारांची एक राष्ट्रीय ट्रेंड युनियन नाही जे देशातील तमाम कामगार,कर्मचारी आणि अधिकारी यांच्या दबावाखाली काम करेल. मग देशातील ९३ टक्के असंघटीत कामगार मजुरांचे समाज प्रबोधन कोण करेल?.(स्वतंत्र मजदूर युनियन ही आज एकमेव राष्ट्रीय ट्रेड युनियन २२ राज्यात आणि ३२ क्षेत्रात किर्याशील आहे.राष्ट्रीय मान्यतेसाठी चार राज्यात व चार क्षेत्रात ती पाहिजे आणि पाच लाख सभासद संख्या पाहिजे २०२३ च्या वार्षिक आवहालात ती झाली असती.पण केंद्र सरकारने सर्वच खात्यात कंत्राटी करण सुरु केल्यामुळे त्याला ही अडचण निर्माण केल्या गेली.)

१९२७ ते १९५६ पर्यंत मागासवर्गीय शोषित वंचित समाज जो असंघटीत कामगार शेतमजूर होता तो असुशिक्षित अज्ञानी मोठ्या प्रमाणत होता तरी तो डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक जनआंदोलनात अक्षरशः आपले जीवन कुर्बान करीत होता, समाजातील असंघटीत कामगार मजुरांच्या ध्येय धोरणांशी,कार्याशी आपण जितके प्रामाणिक राहू, तितकी बाबासाहेबांची चळवळ आपल्यात जीवंत राहिल. रिपब्लिकन पक्षाच्या गटा तटांना अनेकदा भावनिकतेवर आधारित ऐक्य करावे लागले आणि ते करण्यास भाग पडणारा कोणी पदवीधर प्राध्यापक,डॉक्टर,वकील,इंजिनियर नसतात. आंबेडकर चळवळ संपली या छोट्या पुस्तकात लेखक बाळासाहेब आंबेडकर यांनी ऐक्यासाठी उपोषण करणारे कोण आहेत आणि त्याचे शिक्षण व रोजगार काय आहे हे नांवासह दिले आहे.सर्व असंघटीत कामगार मजूर होता.हे लक्षात घ्या. आताही त्यांनाच पुढाकार घ्यावा लागेल.कारण समाजात असंघटीत कामगारंचे प्रमाण मोठ्या संख्येने वाढत आहे.त्यांच्या पाठीवर कोण कधी हात ठेऊन आपले करेल हे सांगता येत नाही. रिपाईच्या सर्व बालेकिल्ले कुठे आहेत हे शोधावे लागेल. अहंकार,मतभेद,प्रलोभन,अमिषापायी आंबेडकरी चळवळीतील सामाजिक,राजकीय निष्ठा गौण ठरत आहे. आज आपला सामाजिक,राजकीय पाया काय आहे?. ज्या क्रांतिकारी चळवळीला तत्वज्ञान आहे, क्रांतिकारी सामाजिक बांधिलकी असलेले कार्यकर्ते आहेत,परंतु त्याच समाजासमोर, चळवळीसमोर पर्याय नसल्याने आज अनेक प्रश्नचिन्ह आहेत. अत्याचार आणि भावनिक प्रश्नापुरती चळवळ फक्त लढते आहे.पण निकाल काय?.संविधानानुसार ग्रामपंचायत ते राष्ट्रपती पर्यंत निवडणुका होऊन निकाल लागतो.त्याकरिता भारतीय नागरिक म्हणून नांव नोंदणी झाली तरच मतदानाचा अधिकार असतो,ग्रामपंचायत सदस्य ते आमदार, खासदार कोण कोणाला कसे निवडून देते हे उठता बसता भारतीय घटनेच्या शिल्पकारांचे नांव घेणाऱ्या समाजाला सांगणे मला शोभणारे नाही.

डॉ.बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या राजकीय पक्षाची आपण काय अवस्था करुन ठेवली आहे? पक्षाची राजकीय मान्यता, निवडणूक चिन्ह ही आपण केव्हाच गमावून बसलो आहोत. अत्याचार,अन्याय,भावनिकता आणि बाबासाहेबांच्या नावाचे भांडवल करुन अजून किती सोयीच राजकारण आपण सर्व करणार आहोत?. राजकारणात बेरीज चालते,आपण तर वजाबाकी व भागाकार करीत आहोत.आपली निर्णायक बलाढ्य शक्ती असतांना, आपण राजकारणात अदखलपात्र का ठरु लागलो? आंबेडकरी चळवळ राजकीय,सामाजिक चळवळीचे होत असलेले पतन आंबेडकरी अनुयायांना अभिमानास्पद आहे का? प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे प्रत्येक गटा तटाचा फायदा इतर राजकीय पक्षांना होणार असेल तर?. राजकारण कशासाठी,कोणासाठी आणि का करायचे ?.

३ ऑक्टोबर २०२३ रोजी,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या स्थापनेला ६६ वर्ष पुर्ण होत आहेत.काही रिपाई गटाची मान्यता रद्ध करण्यात आल्याचे आपण वाचले असेलच.कारण त्यांनी रीतसर हिसाब ठेवला नाही आणि सादर केला नाही.तीच परिस्थिती सामाजिक धार्मिक शौक्षणिक संस्था,संघटना यांची आहे.मग आता कोणता रिपाईचा गट बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचाराचे नेतृत्व करण्यास सक्षम आहे. राज्यात आणि देशात एका रिपब्लिकन गटाचे नांव सतत चर्चेत असते.ते म्हणजे नामदार खासदार रामदास आठवले देशातील एकमेव नेता ज्यांना भेटण्यास कोणतीही वेळ व जागेचे बंधन नाही. वैचारिक शत्रूच्या कळपात जरी असले तरी आपला व्यक्तिगत ठसा सर्व समाजात ठेऊन आहेत. समाजाला पक्षाचा फायदा होत नसला तरी काही कार्यकर्ते त्या नावावरच पोट भारतात. त्यांच्या सोबत जो फौजफाटा आहे तो सर्वच क्षेत्रात संघर्ष आणि नेतृत्व करण्यास तयार असतो. रामदास आठवले यांची बहुजन समाजात रिपब्लिकन नेते म्हणून ओळख समाजमान्य आणि लोकमान्य आहे.रिपब्लिकन पक्षाचा वर्धापनदिन अधिकृत पणे साजरा करणारा एकमेव गट असला.तरी तो रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट गाठण्यास असमर्थ आहे. कारण त्यांच्याही गटाला संविधान किती मान्य आहे हे त्यांच्या कार्यप्रणाली आणि जाहीर सभेच्या स्टेजवरील नेत्याच्या गर्दीवरून लक्षात येते.सर्वच रिपब्लिकन गटाचे नेतृत्व करणारे एक नंबर नेतृत्व सोडल्यास राज्यात दोन,तीन चार पाच नंबर राज्याचे नेतृत्व करणारे नेते नाहीत.

प्रशिक्षित कार्यकर्ते नाहीत.लेटर हेड वर जगणारे कार्यकर्ते समाजाला स्वाभिमानी बना सांगु शकत नाही. सरकारी योजनांची अभ्यासपूर्ण माहिती नाही. समाजाचा आणि जनतेला कसा लाभ मिळवुन द्यावा यावर जनांदोलन उभे न राहता स्वतःला किती कमिशन अथवा दलाली भेटलं यावर सर्व लक्ष केंद्रित असलेले कार्यकर्ते, नेते पक्षाला कोणती दिशा दाखवून पुढे नेतील. त्यामुळेच असंघटीत कष्टकरी कामगार,मजूर,शेतमजूर मोठ्या संख्येने इतर पक्ष संघटने कडे वळतो आहे.याचा सर्वच जागृत कार्यकर्ता, बुद्धीजीवी,साहित्यिकांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे.रिपब्लिकन विचारधारा किती ही चांगली असली तरी तिचे आचरण करणारे अनुयायी नसतील तर रिपाई रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट गाठूच शकत नाही. लोकशाहीचे बंधन मान्य नसणारे कार्यकर्ते लगेच पन्नास शंभर लोक सोबत घेऊन पक्ष संघटना काढत राहिले म्हणजे काय होईल?. म्हणून सर्व गल्लीबोळातील तरुणांनी प्रथम आपल्या विभागातील स्वार्थी,अहंकारी कार्यकर्ते संपविण्याची जबाबदारी घ्यावी.आणि आपल्या परीसारतील आंबेडकरी समाज एकसंघ करण्याचा प्रयत्न करावा.भारताला दिलेल्या लोकशाहीच्या मार्गाने नेता निवडावा जो लोकशाही मान्य करीत असेल आणि लोकशाहीने पक्ष संघटना चालवीत असेल तोच रिपाईचा नेता असेल. रिपाईच्या वर्धापन दिना निमित्य आत्मचिंतन परीक्षण करणे आवश्यक आहे. आणि रिपाईला संविधान मान्य नसल्यामुळेच राज्यात आदरणीय एड बाळासाहेब आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडी हा मजबूत आणि वैचारिक राजकीय पर्याय बहुजन समाजाला दिला आहे.तो सर्व बहुजन समाजाने स्वीकारला पाहिजे.तो ६६ व्या वर्षात रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट साध्य करील अशी परिस्थिती राज्यात आहे. राजकीय स्वप्न साखार करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी च्या मागे उभे राहिले पाहिजे आणि गट बाजीला मूठमाती दिली पाहिजे.इतिहास वाचून इतिहास घडविता येतो.म्हणूनच रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट कोणते त्याचे आत्मचिंतन आत्मपरीक्षण करा.३ ऑक्टोबर,१९५७ रिपाईच्या ६६ व्या वर्धापन दिना निमित्य सर्व बहुजनानां हार्दिक शुभेच्छा.

सागर रामभाऊ तायडे,भांडूप मुंबई,९९२०४०३८५९.

# किचनमधील ‘हे’ चार मसाल्यांचे पदार्थ चयापचय क्रिया वाढवण्यासह वजन ठेवतील नियंत्रणात; आताच आहारात करा समावेश

निरोगी राहण्यासाठी नियमित व्यायाम करण्यासह आहारात काही पदार्थांचा समावेश करणे महत्वाचे आहे. सध्या धावपळीच्या जगात प्रत्येकाला आपल्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही. परिणामी लठ्ठपणा, मधुमेह यांसारख्या अनेक गंभीर आजारांचे प्रमाण वाढत आहे. पण, तुम्हाला भविष्यात निरोगी आयुष्य जगायचे असेल, तर लहानपणापासूनच तुम्ही वजन नियंत्रणात ठेवले पाहिजे. पण, वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी तुमच्या शरीरातील चयापचय प्रक्रिया सुरळीतपणे चालू राहणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम आणि संतुलित आहार तुम्हाला वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करील; पण तुमच्या किचनमध्येही असे काही मसाल्याचे पदार्थ आहेत की, जे तुमच्या निरोगी आरोग्यासाठी अधिक उपयुक्त ठरू शकतात. अपोलो हॉस्पिटल्सच्या मुख्य आहारतज्ज्ञ डॉ. प्रियंका रोहतगी यांनी ‘द इंडियन एक्स्प्रेस’शी बोलताना शरीरास फायदेशीर अशा किचनमधील मसाल्याच्या चार पदार्थांची माहिती दिली आहे. चला तर मग जाणून घेऊ त्याविषयी.किचनमधील दालचिनी, आले, लसूण व मोहरी हे चार पदार्थ तुमच्या शरीरातील चयापचय क्रिया सुधारण्यासह वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी एका बूस्टर डोसप्रमाणे काम करतात. दालचिनी दालचिनी हा असा मसाल्यातील पदार्थ आहे; जो तुमच्या शरीरातील चयापचय क्रिया वाढवण्यासह वजन कमी करण्यास मदत करतो. त्यातील औषधी गुणधर्मामुळे शतकानुशतके आहारात याचा समावेश केला गेला आहे. विशेष म्हणजे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठीही दालचिनी उपयुक्त मानली जाते. हाय ब्लड शुगरमुळे तुमची चयापचय क्रिया मंदावते. पण, दालचिनी इन्सुलिनची संवेदनशीलता वाढविण्यासही मदत करते; ज्यामुळे तुमच्या पेशी ग्लुकोज चांगल्या प्रकारे शोषून घेतात आणि तुमच्या शरीरास ऊर्जा पुरवतात. दालचिनीमध्ये थर्मोजेनिक गुणधर्म आहेत; जे शरीरात उष्णता निर्माण करण्याच्या प्रक्रियेस गती देतात. त्यामुळे विश्रांतीच्या वेळीही जास्त कॅलरीज जाळण्यास मदत होऊ शकते.आले आले हा मसाल्याचा पदार्थ आहारातील महत्त्वाचा भाग मानला जातो. आल्यामध्ये अनेक औषधी गुणधर्म असून, आहारात त्याचा योग्य वापर झाला पाहिजे. आले हे पचनक्रिया निरोगी ठेवून चयापचय वाढवते आणि पोषक द्रव्ये शोषण्यास मदत करते.दालचिनीप्रमाणेच आल्यामध्ये थर्मोजेनिक गुणधर्म असतात. ते तुमच्या शरीराचे तापमान किंचित वाढवून कॅलरीज बर्न करण्यास मदत करू शकते.



त्यामुळे भुकेची भावना कमी होते; तसेच कोलेस्ट्रॉल, रक्तातील साखर, रक्तदाब, दाहक प्रथिने व यकृताच्या आरोग्यामध्ये सकारात्मक बदल होतात.लसूण तिखट सुगंध आणि चव यांसाठी प्रसिद्ध असलेला लसूण हजारो वर्षांपासून पाक आणि औषधी दोन्ही हेतूंसाठी वापरला जात आहे. त्यात ॲलिसिन आहे हे एक संयुग आहे; जे तुमची चयापचय वाढविण्यासाठी उपयुक्त असते. तसेच शरीरातील चरबीचे प्रमाण कमी करते. लसूण शरीरात लिपोलिसिसच्या प्रक्रियेस चालना देत चरबीचे ऊर्जेत रूपांतर करण्यास मदत करते. त्यामुळे तुमची चयापचय क्रिया सुधारते.रक्ताचा प्रवाह सुरळीत करण्यासाठीही लसूण फायदेशीर मानले जाते. तसेच शरीरातील पेशींना पोषक घटक आणि ऑक्सिजन वितरित करण्यासाठीही लसूण उपयुक्त असते.मोहरीचे दाणे मोहरीचे दाणे आकाराने लहान असले तरी ते चयापचय वाढवण्याच्या बाबतीत खूप फायदेशीर मानले जातात. विविध पाककृती आणि मसाल्यामध्ये एक सामान्य घटक आहेत, मोहरी जीवनसत्त्वे ए, बी-कॉम्प्लेक्स व सी, तसेच कॅल्शियम व मॅग्नेशियम यांसारख्या खनिजांसह आवश्यक पोषक तत्त्वांनी समृद्ध आहे. हे पोषक घटक चयापचय प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. उदाहरणार्थ- व्हिटॅमिन बी-कॉम्प्लेक्स शरीरात ऊर्जा निर्माण करण्यासाठी फायदेशीर असते. तसेच कॅल्शियम स्नायूंची आकुंचन क्रिया सुलभ करण्यास चयापचय क्रिया सुधारण्यास उपयुक्त ठरते.मोहरीच्या बियांमध्ये सेलेनियम हे एक ट्रेस खनिज असते; जे निरोगी थायरॉइड प्रक्रिया सुरळीतपणे चालू ठेवण्यास मदत करते.त्यात फायबरचे प्रमाण अधिक असल्याने भुकेची लालसा कमी होते.

मोहरीचे दाणे प्रथिनांनी समृद्ध असतात; जे स्नायूंच्या ऊती तयार करणे आणि दुरुस्त करणे यांसाठी आवश्यक असतात. त्यामुळे तुमची चयापचय क्रिया वाढू शकते आणि आरामानंतरही जास्त कॅलरी बर्न होऊ शकतात.मोहरीच्या दाण्यांमधील आणखी एक महत्त्वाचा पोषक घटक म्हणजे ओमेगा-३ फॅटी ॲसिड; जे शरीरातील जळजळ नियंत्रित करण्यास मदत करते. यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास आणि वजन कमी करण्यासाठी मदत होते.आहारात ‘या’ मसाल्यांचा असा करा समावेश दालचिनी : तुमच्या सकाळच्या ओटमिल किंवा स्मूदीमध्ये चिमूटभर दालचिनी घाला. दालचिनी विविध पदार्थ आणि करीसारख्या चवदार पदार्थांमध्ये एक स्वादिष्ट चव आणते. आले : आल्याचा चहा तयार करून प्या किंवा आले मॅरीनेडमध्ये वापरा. त्याशिवाय स्टीयर फ्राईज आणि सूपमध्येही तुम्ही आले किसून वापरू शकता. त्यामुळे तुमचे जेवण अधिक स्वादिष्ट होईल. लसूण : पास्तापासून अनेक भाज्यांमध्ये तुम्ही लसणाचा वेगवेगळ्या प्रकारे वापर करू शकता. तुम्ही लसूण किसून, बारीक करून किंवा जाड तुकडे करून विविध खाद्यपदार्थांमध्ये वापरू शकता.मोहरीचे दाणे : तुम्ही डाळ किंवा विविध प्रकारच्या भाज्यांना फोडणी देण्यासाठी मोहरीचे दाणे वापरू शकता. त्याशिवाय सलाड , सॉस किंवा लोणच्यामध्ये याचा वापर करू शकता.अशा प्रकारे तुम्हाला नैसर्गिकरीत्या चयापचय प्रक्रिया सुरळीत करायची असेल आणि वजन कमी करायचे असेल, तर तुम्ही आहारात या पदार्थांचा समावेश करू शकता. त्यामुळे तुम्ही भविष्यात अधिक उत्साही आणि निरोगी जीवनशैली जगू शकता. तसेच संतुलित आहार आणि नियमित शारीरिक हालचाली यांनाही तुमच्या दैनंदिन जीवनाचा भाग करून घ्या.

# उष्णता आणि पावसाचे मोडणारे विक्रम

भारतात बदलणारे हवामान आता चिंतेचा विषय ठरत आहे. ग्रीन हाऊस गॅसेसचे उत्सर्जन आणि त्यापासून वाढणारे जागतिक तापमान शहरावरच नाही तर मानवी आरोग्यावर देखील परिणाम करत आहे. १८५० च्या औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीपासून पृथ्वीचे तापमान १.२ अंश सेल्सिअसने वाढले आहे. हा एक सरासरी आकडा आहे. जगातील वेगवेगळ्या भागात प्रामुख्याने उत्तराखंड, हिमाचल प्रदेशासारख्या पर्वतीय राज्यांत ही वाढ अधिक राहू शकते. प्रत्येक एक अंश सेल्सिअस तापमान वाढल्याने वातावरणात आर्द्रतेचा स्तर हा सात ते आठ टक्के वाढत जातो. परिणामी सर्वसाधारण पावसापेक्षा प्रचंड प्रमाणात पाऊस पडतो तर कधी कधी ढगफुटीसारख्या घटनेला सामोरे जावे लागते. दाट आणि उंच ढगात गारा अधिक मोठ्या असतात. त्यामुळे वीज जोरात कडाडते आणि त्याचबरोबर वीज कोसळण्याच्या घटनाही वाढतात. भारतात २००० ते २०२१ या काळात ४९ हजारांपेक्षा नागरिकांचा वीज अंगावर पडून मृत्यू झाला आहे. यावर्षी देखील वीज पडल्याने मृत्युमुखी पडणा-यांची संख्या अधिक आहे. मुसळधार पावसाने यावर्षी भारतात २००० पेक्षा अधिक मृत्यू झाले आहेत. एकटया बिहारमध्ये ५०० पेक्षा अधिक लोकांचा बळी गेला आहे.

हवामान बदलाचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे अधूनमधून पाऊस पडणे आणि उष्णता वाढणे. त्यात पाऊस पडतो आणि तोही खूप जोराचा असतो. त्याचवेळी त्याचा कालावधी देखील कमी असतो. आता पाच ते सात दिवसातच संपूर्ण हंगामातील पावसाची नोंद होते. गेल्या जुलै महिन्यांत राजस्थान आणि गुजरातमध्ये तर हीच स्थिती झाली. जुनागडमध्ये तर न भूतो न भविष्यती असा पाऊस झाला. गाड्या पाण्यावर तरंगत होत्या. हे दृश्य आपण टिव्हीवर पाहिले. याप्रमाणे हवामान बदलामुळे उष्णतेच्या झळा अधिकच वाढल्याचे दिसून येत आहे. आता पुढेही राहिल. यात विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट, चक्रीवादळ आदींसह पडणारा पाऊस पूर्वीपेक्षा अधिक होताना दिसतो. त्यामुळे वातावरणात निर्माण होणारे चक्रीवादळ आता अधिक विनाशकारी, प्रलयंकारी सिद्ध होत आहे.

हवामान बदलामुळेच गेल्या तीन दशकांत गंगा नदीच्या पात्रात अणि ईशान्य भारतात पावसाचे प्रमाण कमी राहात आहे. त्याचवेळी उत्तर पश्चिम भारत, पश्चिम घाट, तमिळनाडू, रायलसीमा, तेलंगण आदी ठिकाणी प्रमाणाबाहेर पाऊस पडत आहे. अन्य भागात पाऊस किंवा दुष्काळाचा एकाचवेळी सामना करावा लागत आहे. दुष्काळाची स्थिती खरीप पिकाच्या वेळी राहत असेल तर त्याचा परिणाम कृषी उत्पादनावर पडू शकतो. जसे ऑगस्ट महिन्यांत पाहावयास मिळाले. प्रामुख्याने डाळी, तेलबिया आणि पावसावर अवलंबून असलेल्या अन्य पिकांवरून शेतक-यांची चिंता वाढणे स्वाभाविक आहे. हवामान बदलामुळे पावसाचे दिवस कमी होत आहेत, मात्र मुसळधार पावसाच्या घटनाही घडत आहेत. आगामी काळात जागतिक तापमान १.५ अंश सेल्सिअसवरून दोन अंश सेल्सिअसपर्यंत वाढल्याने पावसाचे प्रमाण वाढेल.

हवामानाची दिशा बदलत असून कधी विक्रमी पाऊस पडत आहे तर कधी उष्णतेची लाट येत आहे. वेस्टर्न डिस्टबर्न्स अणि मान्सून यांच्यात परस्पर क्रिया होते, तेव्हा त्याचा प्रभाव असलेल्या भागात मुसळधार पाऊस पडतो. मुसळधार पावसाची ही स्थिती तीन ते पाच दिवस राहते. जसे जुलै महिन्यांत हिमाचल प्रदशात पाहवयास मिळाली. अशा पावसाची तीव्रता मागील सर्व विक्रम मोडू शकते. याप्रमाणे उष्णतेची तीव्रता देखील दरवर्षी वाढत चालली आहे. नैसर्गिक आपत्तीच्या घटनांत सातत्याने वाढ होत असून त्यात हवामान बदल घटक जबाबदार आहे. जागतिक तापमान वाढले असून त्याच्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

तसेच काही भागात मुसळधार तर एका मोठ्या भूभागावर दुष्काळाची छाया देखील पाहवयास मिळत आहे. अर्थात पावसाळा अनेक घटकांवर अवलंबून असतो. जसे अल नीनो, हिंद महासागरातील ‘डाय-पोल (द्विध्रुव) स्थिती या कारणांमुळे एकाचवेळी देशातील विविध भागात पाऊस आणि दुष्काळ याचा सारखाच अनुभव येतो. म्हणूनच ऑगस्ट महिना अनेक भागात कोरडा गेला. अशा हवामानाचा मानवी आरोग्यावर देखील प्रतिकूल परिणाम होत आहे. कधी कधी उष्णतेच्या लाटेने मृत्यू पडणा-यांची संख्या वाढत आहे; उष्णतेच्या लाटांचे व्यवस्थापन केल्यास काही प्रमाणात अशा घटना रोखता येऊ शकतील. दुसरीकडे पावसानंतर उष्णता आणि आर्द्रता या वातावरणांमुळे डेंग्यू, चिकनगुनिया यासारख्या आजाराला कारणभीत असणारे डास वाढण्याला हातभार लागतो. हवामानात पाणी खराब होते तर मलेरिया, अतिसारसारख्या आजारांचा फैलाव होण्याचा धोका राहतो. वाढत्या प्रदूषणामुळे अस्थमा आणि फुफ्फुसात संसर्ग वाढण्याचा धोका देखील राहतो. अशावेळी तापमानाचा पराकोटीचा अनुभव घेण्यापासून वाचण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. जीवनशैलीशी संबंधित असणारी पायाभूत रचना भविष्यातील परिस्थितीशी अनुकुल तयार करावी लागेल. नैसर्गिक पातळीवरची जोखीम आळखून पायाभूत आराखडा आणि प्रणालीचा आढावा घ्यावा लागेल. जोशीमठ आणि परिसरात पाहवयास मिळालेल्या भूस्खलनासारख्या स्थितीपासून वाचण्यासाठी भरीव प्रयत्न करता येईल. देशभरात राबविण्यात येणा-या विकास योजनांमुळे निर्माण होणारी संभाव्य जोखीम देखील पाहिली पाहिजे आणि त्यानुसार त्याची आखणी करायला हवी. यानुसार पूर आणि आर्थिक हानीपासून वाचू शकतो. पावसाचे जादा प्रमाण लक्षात घेता आपल्याला आता प्रत्येक शेतकरी कुटुंबाला शेततळे तयार करण्यासाठी प्रोत्साहित करावे लागेल. जेणेकरून वातावरणात दीर्घकाळ राहणारी उष्णता आणि कमी पावसाच्या स्थितीत त्याच्याकडे सिंचनाची पर्यायी व्यवस्था राहिल.अशा स्थितीत सर्वसामान्य नागरिकांची जबाबदारी अधिकच वाढते. सांडपाणी व्यवस्थेकडे दुर्लक्ष करणे, अतिक्रमण यासारख्या मानसिकतेतून आपल्याला बाहेर पडावे लागेल. जेणेकरून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह रोखला जाणार नाही. आपत्ती व्यवस्थापन आणि हवामान बदलामुळे संवेदनशील राहणा-या भागात इशारा देण्याचे प्रमाण वाढल्याने हवामान शास्त्रज्ञांचे काम अनेक पटींनी वाढले आहे. आता लोकांना त्यांच्यासमवेत वाटचाल करण्याची सवय ठेवावी लागणार आहे.

# मोठ्या साहित्यिक विचारवंत माणसापेक्षा मोठा माणूस

मोठे मानस छोट्या माणसासाठी लिहत नाही.छोटे मानस मोठ्या माणसासाठी नेहमीच आदर्श ठेऊन लिहतात.म्हणूनच सागर तायडे साठी हे लिहतो.असंघटीत कष्टकरी नाका कामगार,मजूर,शेतमजूर मोठ्या संख्येने इतर पक्ष संघटने कडे वळतो आहे.याचा सर्वच जागृत कार्यकर्ता,बुद्धीजीवी,साहित्यिकांनी गांभीर्याने विचार केला पाहिजे.तो त्यांनी केला नसल्यामुळेच रिपब्लिकन पक्षाची विचारधारा किती ही चांगली असली तरी तिचे आचरण करणारे अनुयायी नसल्यामुळे रिपब्लिकन पक्षाचे अंतिम उद्धिष्ट गाठू शकला नाही. त्या रिपब्लिकन पक्षाचा वर्धापन दिवस ३ ऑक्टोबर आहे. आणि असंघटीत कष्टकरी नाका कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणारे कामगार नेते सागर तायडे यांचा जन्म ही ३ ऑक्टोबरच आहे.त्यामुळेच ही दिनांक डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांशी खूप जुळणारी आहे. त्यांचे प्राथमिक शिक्षण गाडेगाव खुर्द,माध्यमिक शिक्षण सुनगांव, तालुका जळगाव,(जामोद) जिल्हा बुलढाणा या ठिकाणी झाले. पुढे त्यांनी मुंबई या ठिकाणी शिक्षण घेतले. असंघटीत कष्टकरी नाका कामगारांच्या न्याय हक्कासाठी सत्यशोधक बिगारी कामगार संघटनेच्या माध्यमातून त्यांच्या समस्या मांडण्याचे काम त्यांनी सुरु केले. त्यांना लिहण्यासाठी प्रोत्साहन विजय सातपुते आणि शरद पाटील यांनी दिले, त्यामुळे त्यांनी अनेक समस्यावर लिहायला सुरुवात केली.ती आज ही मोठ्या प्रमाणात सुरु आहे. त्यांचा पहिला लेख अब्राम्हणी सत्यशोधक मासिकाला पाठविला आणि त्यात तो छापुन देखील आला.तेव्हा त्यांना बरे वाटले. खर तर कोणत्याही नवीन लेखकाला आपला लेख छापुन आल्यावर अतिशय आनंद होतो.तसा सागर तायडे यांना पण झाला होता.



सागर तायडे हे टाटा पॉवर कंपनीत नोकरी करत होते.पण ते ग्रामीण भागातील आल्याने त्यांना असंघटीत कष्टकरी कामगारां बद्दल आस्था होती.त्यामुळे त्यांनी आजूबाजूला चालत असलेल्या घडामोडींचा समस्याचा जवळून अभ्यास केला.आणि त्यावर लिहायला सुरवात केली.मग त्यांच्या लिखाणात गरिबांच्या व्यथा,सामाजिक प्रश्न,समस्या आणि राजकीय परिस्थिती या संदर्भात विश्लेषण करणारे लेख बातम्या प्रसिद्ध होत होत्या.धार्मिक, सामाजिक,शैक्षणिक आरोग्याबाबत सातत्याने लिहायला सुरुवात केली ते सत्य परिस्थितीवर पोटतिडकीने लिहीत असल्याने आणि वास्तवदर्शी असल्याने त्यांचे लेख साप्ताहिक, दैनिक मध्ये नियमितपणे प्रसिद्ध होत होते. आणि आज ही ४० पेक्षा जास्त वृत्तपत्रात त्यांचे लेख बातम्या प्रसिद्ध होत असतात.

कामगार नेते स्तंभ लेखक सागर तायडेचा जीवन संघर्ष त्यांच्या कौटुंबिक जीवन संघर्षा संदर्भात बाबत जर विचार केला. तर नक्की लक्षात येईल की त्यांची पत्नी ही चंद्रकला सागर तायडे ही अतिशय प्रेमळ असून,गरिबीची जाण असणारी आणि सुख दुःख समजून घेणारी होती. तिचा अलीकडेच २७ सप्टेंबर २०२३ रोजी ६० वा वाढदिवस होता. आईच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांचा मुलगा प्रशांत सागर तायडे यांचा शून्यातून विश्व निर्माण करणारी मुलगी,पत्नी आणि आई,लेख मी वाचला त्यात ते आई आणि बाबा संदर्भात एक प्रेरणा देणारे व्यक्तिमत्व असल्याचे सांगतात. बुद्धाने महिला मध्ये पाच गुण असले पाहिजे यांचे वर्णन सांगितले ते प्रशांतने माझी आई चंद्रकला सागर तायडे यांच्या असल्याचा उल्लेख केला आहे.ती प्रेमळ आहे,सुख दुःखात सहभागी होऊन पुढे चालणारी आहे. आपल्या कडील नातेवाईक असेल या तर पती कडील सर्वांना समान वागणूक देणारी आहे. त्यामुळे सागर तायडे हे आपल्या घरा बाबतीत निश्चित राहतात. ते सत्यशोधक कामगार संघटनेचे संस्थापक सदस्य आहेत. आता ते महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष आहेत. त्याच बरोबर ते स्वतंत्र मजदूर युनियन महाराष्ट्राचे अध्यक्ष आहेत. विशेष म्हणजे ते स्तंभलेखक असून संपूर्ण महाराष्ट्रात त्यांचे चाळीस पेक्षा जास्त दैनिकात लेख नियमितपणे प्रसिद्ध होत असतात. त्यांचे लिखाण हे सामान्य लोकांच्या हितासाठी असते. म्हणून त्यांच्या लिखाणाला दैनिकात प्राधान्य दिले जाते. लोक काय म्हणतात याचा विचार करायचा नाही.आपल्याला जी गोष्ट पटली त्याबद्दल लिहत राहावे त्याला प्रसिद्धी भेटेलच ही अपेक्षा करू नये असे मला सागर तायडे नेहमीच सांगतात.यामुळेच त्यांनी त्यांचे दोन पुस्तके प्रकाशित केली आहेत. १) क्रांतिकारी विचारांच्या सागर लाटा २) आरक्षण लाभार्थींनी शासनकर्ती जमात बनावे. आणि पुढील काळातपण त्यांची दोन तीन पुस्तके निघतील एवढे प्रचंड प्रमाणात त्यांचे लिखाण आहे. मी माझ्या अनेक समाज बांधवांना विकत घेऊन मोफत वाटली आहेत.

सागर तायडे यांचा वाढदिवस हा तीन ऑक्टोबर आहे.६२ वर्षे पूर्ण होऊन ते ६३ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यांचा अनुभव खूप प्रेरणादायी आणि लक्षवेधी आहे.नियमितपणे विविध वृत्तपत्रात ते लिहतात आणि माझ्या सारख्याचे लेख नियमितपणे प्रसिद्ध करतात. त्यामुळेच त्यांचा जनसंपर्क मोठ्या प्रमाणात आहे.ओबीसी समाजाच्या अनेक कार्यकर्त्यांना शिक्षकांना त्यांनी लेखक म्हणून ओळख निर्माण करून दिली त्यात मी एक ओबीसी सुतार समाजाचा एक सर्वसामान्य समाज बांधव प्रमोद सूर्यवंशी आहे. त्यांचे मित्र अविनाश टिपले पत्रकार चंद्रपूर यांनी सागर तायडे यांच्या वाढदिवसा निमित्याने लिहलेला लेख मी संग्रही करून ठेवला होता.त्याचा आधार घेऊन कामगार नेते स्तंभ लेखक सागर तायडेचा जीवन संघर्ष हा लेख तयार केला आहे.आणि सागर तायडे साहेबांचा जनसंपर्क मी मुंबई ते नागपूर,चंद्रपूर गडचिरोली गोंदिया,नांदेड,कोल्हापूर,सोलापूर,पुणे नाशिक धुळे नंदुरबार येथील वाचक,पत्रकार आणि कार्यकर्त्याकडून स्वता अनुभवला आहे. कोणत्या तालुक्यात जिल्ह्यातील सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांना त्यांच्याबाबत विचारले की ते त्यांच्या बद्दल खूप गौरवउद्गार काढतात. मार्शल सुतार या व्हॉटसअप ग्रुपवरील माझ्या समाज लिखाणाची खऱ्या अर्थाने बाग फुलविणारे आणि राज्यातील अनेक वृत्तपत्रात माझे लेख प्रसिद्ध होतात त्याबद्दल मी सागर तायडे साहेब आणि मालक,संपादक,संपादकीय मंडळाचे मी जाहीरपणे मनपूर्वक आभार मानतो. सोशल मिडिया वरील सुतार समाजाच्या अनेक ग्रुपवर माझ्या लिखाण बाबत सकारत्मक व नकारात्मक चर्चा होत असते.प्रत्येकाचा एकच प्रश्न असतो प्रमोद सूर्यवंशी ला येवढी प्रसिद्धी कशी काय मिळते.त्यावेळी मी गर्वाने सांगतो. सागर तायडे सारखा वैचारिक मैत्री जपणारा माणूस मी आज पर्यंत पाहिला नाही.त्यांनी जे मैत्रीभावनेने नात जुळवीले ते जातीच्या व रक्ताच्या नात्यापेक्षा मोठे ठरत आहे. त्यांचावर स्तुती सुमने वाहण्य येवढा मी मोठा साहित्यिक विचारवंत नाही.पण मोठ्या साहित्यिक विचारवंत माणसापेक्षा माझ्यासाठी सागर तायडे साहेब निच्छित मोठे वाटतात.माझ्या सारख्याचे लेख कॉम्पुटर वर काना मात्रा विलांटी, अनुस्वार सर्व चेक करण्यासाठी वेळ काढून कष्ट करणारे आणि सर्व पेपरला पाठविण्याची दक्षता घेणारे शोधून सापडणार नाही.म्हणूनच मी त्यांना यांच्या वाढदिवसाच्या निमित्याने हे चार शब्द लिहले आहेत.माझ्या परिवार कडून हार्दिक शुभेच्छा देतो आणि पुढील वाटचालीसाठी मंगल कामना करतो.

प्रमोद सूर्यवंशी
८६०५५६९५२१,
चिखली मातृतीर्थ बुलढाणा.

# क्रिएटिव्ह फाऊंडेशन च्या पुढाकाराने राजमाता जिजाऊ शाळा माझी न्यारी उपक्रम राबवणार....

औसा – जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रिएटिव्ह फाऊंडेशनच्या पुढाकाराने राजमाता जिजाऊ शाळा माझी न्यारी या उपक्रमाअंतर्गत औसा विधानसभा मतदारसंघातील लामजना, बोरफळ व कासारसिरसी कन्या शाळा प्रायोगिक तत्त्वावर विकसित करण्यात येणार असून शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी अधिक सक्षम करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात येणार असल्याची माहिती आमदार अभिमन्यू पवार यांनी (दि.२) रोजी औसा येथील आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेस क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे सचिव सुहास पाचपुते, भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता,सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा भीमाशंकर राचट्टे, जिल्हा उपाध्यक्ष किरण उटगे, प्रा सुधीर पोतदार, रोहयो समितीचे अध्यक्ष सदाशिव जोगदंड, कल्पना डांगे आदी उपस्थित होते.यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले की मतदारसंघातील सरकारी शाळांमध्ये शैक्षणिक सुविधा विकसित करणे. सैद्धांतिक शिक्षणाला प्रात्यक्षिक शिक्षणाची जोड देणे शाळा केंद्रीय विद्यालये, कॉन्व्हेंट शाळांच्या धर्तीवर विद्यार्थ्यांच्या चित्रकला, गायन, वादन, क्रीडा अशा विविध कलागुणांना वाव मिळवून देणे. पाठ्यक्रम शिक्षणासोबत जीवनावश्यक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे. विद्यार्थ्यांना पाठ्यक्रमाबाहेरील शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे. शाळांना फिट इंडिया, स्वच्छ भारत, खेलेगा इंडिया जितेगा इंडिया इत्यादी अभियानाशी जोडणे. योग्य करिअर पाथ निवडण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करणे यासाठी औसा विधानसभा मतदारसंघातील प्रायोगिक तत्त्वावर दत्तक घेण्यात आलेल्या या जिल्हा परिषदेत शाळेत कॉम्प्यूटर लॅब, सुसज्ज ग्रंथालय, विज्ञान व तंत्रज्ञान लॅब, क्रीडा केंद्र, स्मार्ट क्लास रुम, जीवन कौशल्ये प्रशिक्षण केंद्र, संस्कार केंद्र, खुली व्यायामशाळा, स्वच्छ व सुंदर शाळा, संगीत केंद्र, आर्ट गॅलरी, हरित शाळा व आत्मनिर्भर शाळा आशा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येतील या उपक्रमाअंतर्गत प्रत्येकी एका शाळेवर किमान ५० लाख रुपये खर्च येणार असून प्रायोगिक तत्त्वावर घेण्यात आलेल्या या तीन शाळानंतर मतदारसंघातील जवळपास ७० जिल्हा परिषद शाळेत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.



औसा मतदारसंघातील शेत तिथे रस्ता, मनरेगातून ग्रामसमृद्धी अभियाना, फळबाग लागवड आदी अभियाने राज्याला दिशादर्शक ठरली असताना शैक्षणिक क्षेत्रातील या एका वेगळ्या अभियानाचाही दखल नक्कीच घेतली जाईल असेच काम येणाऱ्या काळात राजमाता जिजाऊ शाळा माझी न्यारी या उपक्रमाअंतर्गत औसा मतदारसंघात होईल असेही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले.

११ ऑक्टोबरला उपक्रमाचे उद्घाटन.. आमदार अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून व क्रिएटिव्ह फाऊंडेशनच्या पुढाकाराने राजमाता जिजाऊ शाळा माझी न्यारी या उपक्रमाचे उद्घाटन औसा तालुक्यातील लामजना येथील जिल्हा परिषद शाळेतून केले जाणार आहे.यासाठी लातूरचे जिल्हाधिकारी वर्षा घुगे – ठाकूर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. जिल्हा परिषद शाळा हायटेक करण्याचा मानस – सुहास पाचपुते. भविष्यात जिल्हा परिषद शाळा हायटेक करण्याचा मानस असून ॲड परिक्षीत अभिमन्यू पवार यांच्या संकल्पनेतून व आमदार अभिमन्यू पवार यांच्या पुढाकाराने यांच्या संकल्पनेतून क्रिएटिव्ह फाऊंडेशन हा उपक्रम हाती घेत असल्याचे यावेळी बोलताना क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे सचिव सुहास पाचपुते यांनी सांगितले.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती उत्साहात

लातूर दि. ०१ :– महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची संयुक्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचारमंचावर माजी प्राचार्य डॉ. एम. एस. दडगे, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी आणि डॉ. श्रीराम भालेराव यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. यशवंत वळवी म्हणाले की, महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठाच्या परिपत्रकाप्रमाणे आपण विविध महापुरुषांच्या जयंती महाविद्यालयाच्या प्राध्यापक कक्षामध्ये नियोजित विभागामार्फत पार पाडतो यामध्ये प्रत्येकाला विभागाला जबाबदारी दिल्यामुळे प्रत्येकाचा सहभाग कार्यक्रमांमध्ये असतो यामुले महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या विचाराची माहिती होते. यावेळी डॉ. श्रीराम भालेराव यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या राष्ट्रीय कार्याचा संक्षिप्त आढावा घेऊन त्यांचा जीवन परिचय सर्वांना करून दिला. तसेच यावेळी माजी प्राचार्य डॉ. एम. एस. दडगे यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संगम धाराशिवे यांनी केले तर आभार प्रा. व्यंकट दुडिले यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा. एस. एम. पाटील, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. गोविंद पांढरे, प्रा. के. आर. बिराजदार, नामदेव बेंदरगे, विनायक लोमटे, डी. एन. कांबळे यांच्यासह शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रो. डॉ. राजकुमार लखादिवे, जयंती उत्सव समितीचे समन्वयक प्रा. धोंडीबा भुरे, जलील सैय्यद व शुभम बिराजदार यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला जयंती उत्सव समितीचे सर्व सदस्य, महाविद्यालयातील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते



## सेवानिवृत्ती निमित्त दामोदर सुरवसे यांचा उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी यांच्या हस्ते सत्कार

लातूर, दि. २ – येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील सेवक दामोदर हरीबा सुरवसे हे वयोमानानुसार शनिवारी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व संत ज्ञानेश्वर माऊलींची प्रतिमा भेट देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी विभाग प्रमुख डॉ. अनुजा मनियार, डॉ. सिराज बादल, डॉ. अश्विनी बिरादार, डॉ. विजयालक्ष्मी माले, डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. राघवेंद्र मेत्री, भांडारपाल अमोल महिंद्रकर, लिपीक नेताजी देशमुख, तानाजी जाधव, नितीन गोरडे, गजानन सोमवंशी, दिपक चाटे, चेअर टेक्निशियन संदिप भालेराव, बबन सुरवसे, शुभम भालेराव व सेवक नयुम शेख, सुभाष झुंजारे, शरद कोपनबैयने, ज्ञानेश्वर देशमुख, लक्ष्मण सावळकर, सोमनाथ लांडगे, उत्तरेश्वर गायकवाड, मनोज कांबळे हे उपस्थित होते. दामोदर सुरवसे यांनी दि. १ जानेवारी १९९४ ते दि. ३० सप्टेबर २०२३ या कालावधीत सेवक म्हणून सेवा दिली असून त्यांनी एकूण २९ वर्ष ८ महीने २९ दिवस एवढी प्रदीर्घ सेवा दिलेली आहे. सेवानिवृत्ती निमित्त दामोदर सुरवसे यांचा एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील सर्व डॉक्टर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, सेवक कर्मचारी यांनी सत्कार करुन त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.



## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात विद्यापीठस्तरीय एक दिवसीय भूगोल कार्यशाळेचे आयोजन

लातूर :– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (आय.क्यू.ए.सी. आणि भूगोल विभाग), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात भूगोल विषयाची विद्यापीठस्तरीय एक दिवसीय कार्यशाळा महाविद्यालयातील व्होकेशनल सभागृहात दि. ०३ ऑक्टोबर २०२३ रोजी स. ९ ते सायं. ५ वा. कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार असून उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील मानव्य विद्याशाखा संकुलाचे अधिष्ठाता अधिष्ठाता डॉ. विकास सुकाळे हे उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. आप्पाराव काळगापुरे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रो. डॉ. राजकुमार लखादिवे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रो. डॉ. आनंद शेवाळे, भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समितीचे समन्वयक तथा वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. दीपक चाटे यांची उपस्थिती लाभणार आहे. या कार्यशाळेत डॉ. आप्पाराव काळगापुरे, राजश्री शाहू महाविद्यालय, लातूर येथील भूगोल विभाग प्रमुख प्रो. डॉ. सुरेश फुले, प्रो. डॉ. ओमप्रकाश शहापूरकर आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील अर्थ सायन्स संकुलाचे संचालक डॉ. अविनाश कदम आदि तज्ञ व्यक्तींचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर अभ्यासपूर्ण व्याख्याने संपन्न होणार आहे. कार्यशाळेचा समारोप श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक प्रा. जी. एम. धाराशिवे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार असून प्रमुख अतिथी म्हणून महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी विभागप्रमुख प्रा. एन. बी. रेड्डी, ग्रामीण महाविद्यालय, कोटग्याल येथील प्राचार्य प्रो. डॉ. हरिदास राठोड, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील भूगोल अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. आप्पाराव काळगापुरे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रो. डॉ. राजकुमार लखादिवे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रो. डॉ. आनंद शेवाळे, भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समितीचे समन्वयक तथा वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रो. डॉ. दीपक चाटे यांची उपस्थिती लाभणार आहे. या कार्यशाळेमध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठातील नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयातील भूगोल विभागातील प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य प्रो. डॉ. राजकुमार लखादिवे, प्रो. डॉ. आनंद शेवाळे, भूगोल विभाग प्रमुख कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, प्रो. डॉ. दीपक चाटे डॉक्टर, डॉ. अभय धाराशिवे, डॉ. शिवकुमार इजारे, डॉ. शिवप्रसाद धरणे, डॉ. संगम धाराशिवे यांनी केले आहे.

## सनरीच अक्का परिवार सामाजिक उपक्रमातही अग्रेसर स्वच्छतेसाठी एक तारीख एक तास उपक्रमात महाश्रमदान

लातूर / प्रतिनिधी :– पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार स्वच्छता पंधरवडा– स्वच्छता ही सेवा अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनाच्या आदल्या दिवशी १ ऑक्टोबरला स्वच्छतेसाठी एक तारीख एक तास हा उपक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वरवंटी ता. लातूर येथे हा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये सनरीच अक्का परिवारच्या वतीने महा श्रमदान करण्यात आले.

या उपक्रमात प्रा.शाळा वरवंटी , औसा रोड सरस्वती कॉलनी परिसर , औद्योगिक वसाहत बारा नंबर पाटी, औद्योगिक वसाहत पाच नंबर येथील काही भाग येथे स्वच्छता मोहिम राबवून हा संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन लातूर येथील उद्योजक बालकिशन मुंदडा संचालक मुंदडा फुड्स व सनरिच एक्का यांच्या शुभहस्ते करून स्वच्छता ही सेवा मधील स्वच्छतेसाठी एक तारीख एक तास या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी सनरीच एक्काचे संचालक उद्योजक बालकिशन मुंदडा यांनी सिंगल युज प्लास्टीकचा वापर व दुष्परिणाम याविषयी व स्वच्छतेविषयी यावेळी सविस्तर माहिती दिली. मुख्याध्यापक रामेश्वर गिल्डा यांनी स्वच्छतेची शपथ उपस्थितांना दिली. यावेळी वरवंटी (बसवंतपूर)ग्रामपंचायतचे उपसरपंच राजेश पाटील, बसवेश्वर लांडगे (अध्यक्ष शा. व्य. समिती), ग्रामसेवक शंकर भोसले , रवी शिंदे सदस्य ग्रामपंचायत वरवंटी, रामेश्वर गिल्डा मुख्याध्यापक ,सुजाता खोबरे (सीआरपी) हे यावेळी उपस्थित होते.मुंदडा फुड्स, व सनरिच एक्का परिवार चे स्टाफ कर्मचारी व कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते . त्याच बरोबर नागरिक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी एक तास स्वच्छतेसाठी अंतर्गत शालेय परिसराची व बाहेरील बाजूची स्वच्छता करून आपली सामाजिक बांधिलकीची जपणूक केली. सनरिच एक्का परिवार नेहमीच आपल्या विविध सामाजिक उपक्रमाने ओळखली जाते. प्रत्येक विधायक सामाजिक कार्यात ही संस्था नेहमीच अग्रेसर असते, सनरिच एक्का परिवाराच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या सार्वजनिक स्वच्छता मोहिमेत स्वयंस्फुर्तीने श्रमदान करण्यासाठी पुढाकार ग्रामसेवक शंकर भोसले, मुख्याध्यापक रामेश्वर गिल्डा, सहशिक्षक मधुकर आडसकर, सहशिक्षिका सुरेखा भोसले, वैशाली म्हेत्रे, अरुणा साठे, जयलक्ष्मी मजगे, विजया कुलकर्णी, ग्रामपंचायत कार्यालयाचे कर्मचारी अंकुश वाघमारे शंकर माने, अंगणवाडी कार्यकर्ती सौ. झुंजेताई सौ. राठोड, आशा कार्यकर्ती पुष्पलता मस्के, शालेय पोषण आहार मदतनीस शालुबाई राठोड, बालाजी राठोड यांनी घेतला. याप्रसंगी बहुसंख्येने नागरिक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



## तथागत–डॉ.बाबांसाहेबांपुढे बसायला लाज वाटते.. मग तुम्ही बसणार तरी कोठे? –ज्येष्ठ पत्रकार गुणाजी काजिर्डेकर

मुंबई / प्रतिनिधी करूणासागर तथागत गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांसमोर बसावयास लाज वाटते, मग तुम्ही बसणार तरी कोठे? तुम्ही स्वतः ची जागा निर्माण केली आहे काय? आणि तशी जागा निर्माण केली असेल तर खुशाल जा कोणीही अडवणार नाही!असा उपरोधिक टोला आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ पत्रकार,साहित्यिक गुणाजी काजिर्डेकर यांनी लगावला. मुंबईतील पी.एल.लोखंडे मार्ग चेंबूर येथील सुप्रसिद्ध बुद्धविहारामध्ये उपासाला रंजनाताई शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या वर्षावास प्रबोधनपर कार्यक्रमात ' धम्म, धर्म आणि आजचे वास्तव? या विषयावर ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून धम्मचारी धम्मबोधी, ज्येष्ठ पँथर किसन माने, साहित्यिक आनंद म्हस्के, धम्ममित्र बापूसाहेब चंदनशिवे, कवी बबन तुपेरे आदी मान्यवर उपस्थित होते.

' गुलामांचा कोणताच इतिहास नसतो.' या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानाची आठवण करून देतानाच जागतिक किर्तीचे वैज्ञानिक अल्बर्ट आईनस्टाईन, ओशो व पत्रकार महर्षी आचार्य अत्रे यांनी बुद्ध–बाबासाहेबांविषयी व्यक्त केलेल्या मतांचा धांडोळा घेत,जीवनशुचिता, परिपूर्ण जीवन, निब्बाण, तृष्णेचा नाश, अशाश्वत संस्कार, नीती आणि कर्म या विचारमूल्यांनाच तथागतांनी धम्म असल्याचे विशद करून, थांबले नाहीत तर, धर्म आणि अधर्म यावर धम्मसेनापती भन्ते सारिपुत्तांनी विचारलेल्या प्रश्नावर ' महावग्ग ' मधील गाथांचा आढावा घेऊन, तथागतांचा धर्मोपदेशक वर्तमानाशी कसा सुसंगत आहे यावर गुणाजी काजिर्डेकर यांनी ओघवत्या शैलीत स्पष्टीकरण केले. तथापि धम्मदिक्षेची ६५ वर्षे उलटली तरी काही अनुयायांना स्वतःहून विहारात यावेसे वाटत नाही. त्यांना विहारात या असे विनंतीवजा आवाहन करावे लागते ही फार मोठी शोकांतिका आहे. काही महाभाग आंत काय चालले आहे ते वाकून बघतात व पळ काढतात. अशा लोकांना वेळीच जागा दाखवा, अन्यथा धम्म चळवळीच्या या गाड्याचे विद्रुपीकरण व्हायला फारसा वेळ लागणार नाही असा इशाराही त्यांनी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोपटराव कांबळे व आभार प्रदर्शन सचिव रमेश आढांगळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यास बबन कांबळे, अशोक जगताप, कृष्णा कांबळे, उत्तम झेंडे, नितीन गायकवाड, भास्कर न्यायनित, विजय यादव, विजय पगारे, वसंत भिसे, अभिजित बागुल, अंकुश दाभाडे, भारत माने, राजेश कांबळे, प्रकाश झेंडे, मोहन माने, सम्यक मोठे, ॲड्.विशाल वाघमारे, मनोज कांबळे, रुक्मिणी कोल्हे, प्रगती गायकवाड आणि शीला बापू चंदनशिवे यांनी उत्तम सहकार्य केले.



## शासकीय रुग्णालयात २४ बालके दगावली

नांदेड : महाराष्ट्रातील आरोग्य यंत्रणेचे किती तीनतेरा वाजले हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यानंतर आता नांदेड जिल्ह्यात २४ बालकांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. अवघ्या २४ तासांत दोन डझनहून अधिक बालके दगावले आहेत. मृतांमध्ये १२ नवजात बालके आहेत. दरम्यान औषधांचा पुरवठा वेळेत होत नसल्याचा आरोप रुग्णालयावर करण्यात आला आहे. या प्रकरणी चौकशीची मागणी करण्यात आली आहे.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE